राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी अंशत:/पूर्णत: अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदभरतीस मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण. २०२६/प्र.क्र. २६६/ई-१७६८६६७/टीएनटी-१**

चौथा मजला, विस्तार इमारत हुतात्मा राजगुरु चौक

मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई ४०००३२

**दिनांक : ११ ऑगस्ट, २०२६.**

संदर्भ:- १) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएसएन-२६९५/३९६/९५)/ माशि-२, दि.३१.१२.२००२.

२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएसएन-२०१५/प्र.क्र.१२/ टीएनटी-२. दि.२८.०१.२०१९.

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएसएन-२०१५/प्र.क्र.१२/ टीएनटी-२. दि. ०७.०३.२०१९.

४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएसएन-२०१५/प्र.क्र.१२/, टीएनटी-२, दि.११.१२.२०२०.

५) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. शालार्थ १११८/प्र.क्र.३०/ टीएनटी-३, दि.१०.०६.२०२२.

६) शासन पत्र, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग समक्रमांक दि.०१.०८.२०२२.

७) शासन पत्र, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, संकीर्ण २०२२/प्र.क्र.५६/ टीएनटी -१. दि.१४.०९.२०२२

८) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.६७/, टीएनटी-१, दि.०४.०४.२०२५.

९) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. शिसंमा/शिक्षकेत्तर पदभरती/कार्यासन-टि-४/२५९२, दि. २८.०५.२०२५.

१०) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. अकंपा-२०२५/प्र.क्र.८२९/, टीएनटी-१, दि.२७.०१.२०२६.

११) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. अकंपा- २०२५/ प्र.क्र.८२९,टीएनटी-१, दि. ०४.०६.२०२६.

१२) शासन अधिसूचना, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र. ६८५/टीएनटी-१, दि.१६.०७.२०२६.

**प्रस्तावना:-**

संदर्भ क्र. ८ येथील दि. ०४.०४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशत: /पूर्णत: अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकेत्तर कर्मचारी संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील एकूण रिक्त पदांच्या ८० टक्के रिक्त पदे विहित

कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरण्यास मान्यता प्रदान करण्यात आली होती. तथापि, संदर्भ क्र. ९ येथील शिक्षण संचालक माध्यमिक) व उच्च माध्यमिक .यांच्या दि (२८.०५.२०२५ च्या पत्रान्वये शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पदभरतीस संचमान्यतेची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी स्थगिती देण्यात आली होती .सदर स्थगिती रद्द करुन शिक्षकेत्तर पदभरतीबाबत नव्याने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

संदर्भ क्र. ८ येथील दि. ०४.०४.२०२५ रोजीचा शासन निर्णय व संदर्भ क्र. ९ येथील शिक्षण संचालक माध्यमिक) व उच्च माध्यमिकयां (चे दि .२८.०५.२०२५ रोजीचे पत्र या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात येत आहे.

२. राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशत: / पूर्णतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील खालील संवर्गातील शिक्षकेत्तर पदे सरळसेवेने भरण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. कनिष्ठ लिपीक
२. पूर्णवेळ ग्रंथपाल
३. प्रयोगशाळा सहाय्यक

३. उपरोक्त मान्यता खालील अटींच्या अधिन राहून प्रदान करण्यात येत आहे:-

**अ) <u>संस्था व्यवस्थापनाने सरळसेवेने पदभरतीस मान्यता मिळण्यासंदर्भात करावयाची कार्यवाही :-</u>**

१) संदर्भ क्र. ३ येथील दि. ०७.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केल्याप्रमाणे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठीच्या सुधारित आकृतिबंधाच्या अनुषंगाने व्यपगत होणारी पदे, अतिरिक्त ठरणारी पदे, समावेशनाच्या अटी व शर्ती इत्यादीबाबत कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे याची खातरजमा करण्यात यावी.

२) वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आल्यानंतर संचमान्यतेनुसार त्या-त्या संवर्गाची मंजूर पदे,कार्यरत पदे व रिक्त पदे यांची संख्या निश्चित करण्यात यावी.

३) रिक्त पदे भरण्यासाठी प्रथमत: पदोन्नतीचा मार्ग अवलंबविण्यात यावा. यासाठी नियमित नियुक्तीने कार्यरत पात्र चतुर्थश्रेणी कर्मचारी उपलब्ध असल्यास त्यास पदोन्नती देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

४) रिक्त पदे भरण्यासाठी पदोन्नतीच्या मार्गाने पात्र उमेदवार उपलब्ध झाला नाही तसेच उपलब्ध होऊन त्यास पदोन्नती देण्यात आल्यानंतरही पदे शिल्लक राहत असल्यास अनुकंपा नियुक्तीच्या मार्गाचा अवलंब करण्यात यावा. यासाठी संदर्भ क्र. १० व ११ येथील शासन निर्णय व शासन परिपत्रकातील तरतुदींचे अवलोकन करण्यात यावे.

५) पदोन्नती व अनुकंपा नियुक्ती या मार्गाचा अवलंब केल्यानंतरही कनिष्ठ लिपीक, पूर्णवेळ ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक या संवर्गातील पदे रिक्त राहत असल्यास संचमान्यतेनुसार निश्चित झालेल्या एकूण रिक्त पदांच्या ८० टक्के पदे सरळसेवेने भरता येतील.

६) त्या-त्या संवर्गाची बिंदू नामावली मागासवर्ग कक्षाकडून तपासून घ्यावी. अद्यावत बिंदूनामावलीच्या प्रमाणित प्रतीसह व जाहिरातीच्या प्रारुपासह शिक्षकेत्तर पदभरतीबाबतचा प्रस्ताव प्रकरणपरत्वे संबंधित शिक्षणाधिकारी/ विभागीय शिक्षण उपसंचालक यांना सादर करण्यात यावा. जाहिरातीच्या प्रारुपात त्या-त्या संवर्गातील उमेदवाराची अर्हता संदर्भ क्र. १२ येथील शासन अधिसूचनेतील अर्हतेनुसार नमूद करण्यात आली आहे, याची खातरजमा करावी.

**ब) <u>संबंधित शिक्षणाधिकारी/</u> विभागीय शिक्षण उपसंचालक <u>यांनी करावयाची कार्यवाही</u> :-**

१) बिंदूनामावलीच्या प्रमाणित प्रतीसह व जाहिरातीच्या प्रारुपासह शिक्षकेत्तर पदभरतीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रथमत: संदर्भ क्र. ३ येथील दि. ०७.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही झाली असल्याची खात्री करावी.

२) उपरोक्त (अ) येथे नमूद इतर सर्व बाबींची पूर्तता झाली आहे व चालू संचमान्यतेनुसार रिक्त पदांची संख्या निर्धारित करण्यात आली आहे याची खात्री करण्यात यावी. यासाठी संस्था व्यवस्थापनाकडून आवश्यकतेनुसार शपथपत्र घेण्यात यावे. त्याचप्रमाणे अनुकंपा नियुक्तीसाठी पहिल्या व दुसऱ्या प्रतिक्षा सूचीत पात्र उमेदवार उपलब्ध नाहीत याची शिक्षणाधिकारी (योजना) यांच्याकडून माहिती घ्यावी.

३) जाहिरातीचे प्रारुप काटेकोरपणे तपासून सदर जाहिरात सर्वाधिक खपाच्या प्रत्येकी १ स्थानिक व राज्यस्तरीय वृत्तपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक असल्याची सूचना देण्यात यावी. यासाठी संदर्भ क्र. ५ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-ब अन्वये निश्चित करण्यात आलेली वृत्तपत्रे विचारात घेणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे संबंधित संस्थांच्या संकेतस्थळावर तसेच शाळांच्या सूचना फलकावर सदर जाहिरात प्रसिध्द करणे व अन्य शक्य असलेल्या मार्गाचा अवलंब करुन अधिकाधिक प्रसिध्दी मिळेल अशा पध्दतीने कार्यवाही करणे आवश्यक असल्याची सूचना देखील देण्यात यावी. पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविणे, छाननी, मुलाखत व त्याआधारे अंतिम निवड यादी तयार करणे इत्यांदीसाठी किमान ३ महिन्यांचा वेळ देण्यात आला आहे, याची खात्री करावी. असा वेळ देण्यात आला नसल्यास आवश्यक ती सुधारणा जाहिरातीच्या प्रारुपात करण्याची सूचना करण्यात यावी.

४) जाहिरातीच्या प्रारुपात कमाल वयोमर्यादा खुला प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीयासाठी ४३ वर्षे अशी तरतुद संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयासोबतच्या प्रपत्र-क अन्वये करण्यात आली आहे. त्यानुसार जाहिरातीच्या प्रारुपात अशी तरतुद करण्यात आली आहे किंवा कसे, याची खात्री करावी.

५) शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सुरुवातीचा तीन वर्षाचा कालावधी मानधनावरील नियुक्तीचा असेल याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीच्या प्रारुपात आहे किंवा कसे, याची खातरजमा करावी.

६) प्रमाणित बिंदुनामावलीनुसार भरावयाची पदे जाहिरातीच्या प्रारुपात त्या-त्या सामाजिक प्रवर्गासाठी दर्शविण्यात आली आहेत, याची खातरजमा करावी. त्याचप्रमाणे समांतर आरक्षण योग्य प्रकारे दर्शविण्यात आले आहे, याची खातरजमा करावी.

७) सर्व आवश्यक बाबींची पूर्तता होत असल्यास रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेत सरळसेवा पदभरतीस परवानगी देण्यात यावी.

**क) सरळसेवेने पदभरतीस मान्यता मिळाल्यानंतर संस्था व्यवस्थापनाने करावयाची कार्यवाही :-**

१) प्रकरणपरत्वे संबंधित शिक्षणाधिकारी /विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी ज्या अटी व शर्तींच्या आधारे पदभरतीस मान्यता दिली आहे, त्या अटी व शर्तींची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

२) जाहिरातीत नमूद केल्यानुसार अर्ज मागविणे, छाननी, मुलाखतीचे आयोजन, अंतिम निवड यादी तयार करणे इत्यादीबाबत निश्चित करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसारच कार्यवाही होणे आवश्यक आहे.

३) मुलाखत प्रक्रियेचे इन-कॅमेरा चित्रीकरण संस्थेने स्वखर्चाने करुन त्याबाबतचा अभिलेख जतन करणे आवश्यक राहील.

४) विहित मार्गाने निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यात यावेत.

५) नियुक्तीस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी/विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे सादर करण्यात यावा.

**ड) नियुक्तीस मान्यता देण्याबाबत शिक्षणाधिकारी/विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी करावयाची कार्यवाही :-**

ज्या अटी व शर्तींच्या आधारे पदभरतीस मान्यता देण्यात आली होती, त्या सर्व अटींची पूर्तता झाली आहे तसेच प्रस्तुत शासन निर्णयात नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे, याची खातरजमा करुन नियुक्तीस मान्यता देण्याबाबत कार्यवाही करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१११८११२५४७४९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHARAD
SHRIPATRAO MAKNE

Digitally signed by SHARAD SHRIPATRAO MAKNE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD,
2.5.4.20=40009B0C8C256BDD08326D4D03BC30FB4DE2ADCC1F32BBB9E402266A2B8F7A5A, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=1B4D811632BD3D04BCA0618EEF09D95DD93FF5D37934DF32703629ABD10E555A, cn=SHARAD SHRIPATRAO MAKNE
Date: 2026.08.11 18:12:23 +05'30'

**( शरद माकणे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत ,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास /राज्य उत्पादन शुल्क) यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८. मा. विरोधी पक्षतेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
९. मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य (सर्व)
१०.मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
११.मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

१२.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३.शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक/योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे
१४.सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१५.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१६.सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक/योजना)
१७.सर्व गट शिक्षणाधिकारी
१८. राज्यातील सर्व खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांचे मुख्याध्यापक व सबंधित व्यवस्थापनाचे अध्यक्ष/सचिव
१९.निवड नस्ती- टीएनटी-१